क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/९८

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ४ ऑक्टोबर, २०००.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २९ ऑगस्ट, २००० (मंगळवार) रोजी झालेल्या ९८ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवीत आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

सचिव
कार्यकारी समिति

प्रति,
सर्व सदस्य,

निमंत्रित :
शासनाचे प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्रा.,

प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## ९८ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २९ ऑगस्ट, २००० (मंगळवार) |
| वेळ | : | दुपारी ३.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्यमंत्री यांच्या कार्यालयातील समिती कक्ष, ६वा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. |

उपस्थित सदस्य :

| | |
|---|---|
| श्री.विलासराव देशमुख<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री.रोहिदास पाटील<br>गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्री.सुनील तटकरे<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री.वसंत डावखरे<br>उपसभापती,<br>विधानपरिषद | सदस्य |
| श्री.हरेश्वर पाटील<br>मुंबईचे महापौर | सदस्य |
| श्री.प्रद्युमन उ. मेहता<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री.रा.ता.कदम<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |

| | |
|---|---|
| श्री.अरुण बोंगिरवार<br>शासनाचे मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री.व्ही.रंगनाथन्<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.अवधेश प्रसाद सिन्हा<br>शासनाचे प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | सदस्य |
| श्री.विश्वास धुमाळ<br>शासनाचे सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| श्री.अनिलकुमार लखिना<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | सदस्य |
| श्री.अजित वर्टी<br>महानगर आयुक्त, | सदस्य-सचिव |

<u>निमंत्रित</u> :

श्री.रामानंद तिवारी
शासनाचे प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी श्री.चंद्रकांत वाडकर, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री.व्ही.रंगनाथन्, महापालिका आयुक्त व श्री.ए.पी.सिन्हा, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांचे पदाधिष्ठित सदस्य म्हणून मनःपूर्वक स्वागत केले.

त्यानंतर, मा.अध्यक्ष यांनी श्री.सदानंद सरवणकर, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष, श्री.के.नलिनाक्षन्, माजी महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व डॉ.सुरेश जोशी, माजी प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी प्राधिकरणाचे सदस्य म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, श्री.प्रभाकर नारायण पाटील, माजी अध्यक्ष, कुलाबा जिल्हा परिषद (आताची रायगड जिल्हा परिषद) यांचे दिनांक २१.०२.२००० रोजी तसेच श्री.पांडुरंग शिवराम देशमुख, विधानपरिषदेचे माजी सदस्य, शहापूर यांचे दिनांक १८.०४.२००० रोजी झालेल्या दुःखद निधनाबद्दल मा.अध्यक्षांनी शोक व्यक्त केला व त्यानंतर, प्राधिकरणाने श्री.पाटील व श्री.देशमुख यांच्या निधनाबद्दल शोक ठराव एक मिनिट स्तब्ध उभे राहून मंजूर केला (जोडपत्र १ व २).

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारात घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक १४ फेब्रुवारी, २००० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (९७ व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.**

कार्यवृत्तात खालील सुधारणा करुन कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

"ठराव क्र. ८४६, पृ.क्र.२४ वरील शेवटच्या ओळीतील वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "ई" ब्लॉक या शब्दाऐवजी "जी" ब्लॉक असा शब्द बदल करण्यास मान्यता देण्यात आली.

**बाब क्र.२ : दिनांक १४ फेब्रुवारी, २००० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (९७ व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**<u>बाब क्र.३ : कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ अन्वये जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करण्याबाबत.</u>**

कल्याण संकुल अधिसुचित क्षेत्रासाठी प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून १९७६ सालीच नेमणूक झाली होती. त्यावेळी हया क्षेत्रामध्ये कळवा, मुंब्रा, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ व बदलापूर व आसपासच्या क्षेत्राचा समावेश होता. त्यानंतर, ठाणे महानगरपालिका व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांची स्थापना झाल्यानंतर हया महानगरपालिकांचे क्षेत्र अधिसुचित क्षेत्रातुन वगळण्यात आले असल्यामुळे अधिसूचित क्षेत्राचे नांव कल्याण संकुल असले तरी आता जी प्रारुप योजना तयार केली आहे ती उल्हासनगर, कुळगांव-बदलापूर व आसपासची जी गावे आहेत त्या क्षेत्रापूरती मर्यादित आहेत असे स्पष्ट करण्यांत आले.

परंतु, अधिसूचित क्षेत्राच्या नावांत कल्याणचा उल्लेख असल्यामुळे व कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची निवडणूक जाहीर झाली असल्यामुळे हया प्रारुप विकास योजनेचा विचार करु नये असा निर्णय घेण्यात आला.

सद्याचे अधिसूचित क्षेत्र प्रतिबिंबीत होईल असे योग्य ते नांव सुचवून अधिसूचित नावांत बदल करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाने शासनास पाठवावा असेही ठरविण्यात आले.

**<u>बाब क्र.४ : अनंत काणेकर मार्गाच्या रुंदीकरणासाठी पश्चिम रेल्वेकडून मोबदला देऊन जमीन ताब्यात घेण्याबाबत.</u>**

बाब टिप्पणीत विषद केल्याप्रमाणे सध्याच्या अनंत काणेकर मार्गावरील वाहतूकीच्या समस्येवरील उपाय म्हणून रेल्वेच्या ताब्यातील मोकळया भूखंडामधून आवश्यक जमीन मोबदला देऊन ताबा घेण्याच्या टिप्पणीच्या परिच्छेद क्र.१० मधील

प्रस्तावाचा विचार केला व त्यानुसार प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ८५५ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) व त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण, याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील अनंत काणेकर मार्गाचे प्रस्तावित रुंदीकरणासाठी आवश्यक असणा-या अंदाजे १४६१.६२ चौ.मीटर किंवा प्रत्यक्षात हस्तांतरण करण्यात येणा-या जमिनीच्या मोबदल्यापोटी शासनाच्या नगररचना व मुल्यांनिर्धारण विभागाने सदर जमिनीच्या केलेल्या रु.८५००/- प्रती चौ.मीटर या मुल्यांकनाच्या दराने, तसेच रेल्वेने रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी सदर जमिनीचा ताबा मुंबई महानगरपालिकेस तातडतोब हस्तांतरीत करण्याच्या अटीवर रु.१,२४,२३,७७०/- किंवा प्रत्यक्ष हस्तांतरण केलेल्या जमिनीचे उपरोल्लेखित दराने जे मुल्य असेल ती रक्कम प्राधिकरणाद्वारे उपलब्ध इतर निधीमधून रेल्वेस देण्यास प्रस्तावितेल्याप्रमाणे मान्यता देत आहे. तसेच सदर रस्ता रुंदीकरणाच्या बांधकामाप्रित्यर्थ बृहन्मुंबई महानगरपालिकेने करावयाच्या खर्चाची प्रतिपूर्ती प्राधिकरणाने करण्यास प्रस्तावितेल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या संदर्भात पुढील योग्य ती कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : वडाळा भारवाहक तळातील बी-२ या इमारतीमधील गाळे परिवहन आयुक्त व विक्रीकर कार्यालय यांना भाडेतत्वावर वाटप करणेबाबत.**

वडाळा भारवाहक तळातील बी-२ या इमारतीमधील तिस-या मजल्यावरील जागा परिवहन आयुक्त यांना यापुर्वीच दिलेली आहे. त्यांना दिलेली जागा अपुरी पडत

असल्याने दुसऱ्या मजल्यावरील ४८५.२२ चौ.मीटर इतके अतिरिक्त क्षेत्र भाडेतत्वावर देण्याची विनंती परिवहन आयुक्त यांनी केलेली असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. तसेच, विक्रीकर विभागानेही याच इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील १०३.३५ चौ.मीटर इतक्या जागेची मागणी केली आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे निश्चित केलेले भाडे आकारण्यात येईल असेही महानगर आयुक्तांनी सांगितले.

त्यानुसार, प्राधिकरणाने पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८५६ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम (२) मधील अधिकारांचा व याबाबतीत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे वडाळा भारवाहक तळातील बी-२ इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील ४८५.२२ चौ.मी.परिवध्द क्षेत्र असलेले चार गाळे क्र.२०१, २०२, २११ व २१२ हे परिवहन विभागाला व १०३.३५ चौ.मीटर परिवध्द क्षेत्र असलेले तीन गाळे क्र.२२०, २२१ व २२२ हे विक्रीकर विभागाला याच टिप्पणीच्या परिच्छेद क्र. ४ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून वाटप करण्यास मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.६</u> : <u>वडाळा भारवाहक तळ येथे पोलीस चौकी स्थापन करणेबाबत.</u>

वडाळा भारवाहक तळ येथे प्राधिकरणाने सुविधा इमारत बांधली आहे. या इमारतीमध्ये पोलीस चौकी स्थापन करण्यासाठी पोलीस विभागास प्राधिकरणाच्या

दिनांक २७.११.१९९७ रोजी झालेल्या ९० व्या बैठकीतील ठराव क्र.७३७ अन्वये मंजूर केल्याप्रमाणे जागा वाटपाबाबतचा देकार दिलेला आहे. वडाळा भारवाहक तळामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पोलीस चौकीची नितांत गरज लक्षात घेता, चार पोलीस अधिकारी व तेवीस पोलीस अंमलदार यांच्या अंदाजे वार्षिक रु.३० लाख एवढा आवर्ती खर्चाची प्रतिपूर्ती प्राधिकरणाने ३ वर्षासाठी करावी असा प्रस्ताव होता.

यावर सविस्तर चर्चा करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८५७ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २१-अ नुसार मिळालेल्या अधिकारांचा व याबाबतीत लागू होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वडाळा भारवाहक तळ येथे पोलीस चौकीसाठी नेमणूक करावयाचे चार पोलीस अधिकारी व तेवीस पोलीस अंमलदार यासाठी होणाऱ्या आस्थापना खर्चाची प्रतिपूर्ती (प्रती वर्षी सुमारे ३० लाख रुपयांपर्यंत) पोलिस चौकी स्थापन झाल्यापासून ३ वर्षापर्यन्त प्राधिकरणाने अनुदान म्हणून देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच याबाबतीत प्राधिकरणाच्या अध्यक्षांच्या मान्यतेने केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.७</u> : <u>आर.टी.ओ. घाटकोपर फेरीवाला संघ यांच्या सदस्यांना वडाळा भारवाहक तळातील बी-२ इमारतीनजिक स्टॉलसाठी अनुज्ञप्ती तत्वावर तात्पुरत्या स्वरुपावर जागा देणेबाबत.</u>

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, घाटकोपर येथील आर.टी.ओ. चे कार्यालय वडाळा भारवाहक तळातील बी-२ या इमारतीमध्ये स्थलांतर झाल्याने पूर्वी तेथे

लहान व्यवसाय करुन आपला उदरनिर्वाह करणारे फेरीवाला संघाचे सभासद बेरोजगार झाले आहेत. त्यांच्या विनंतीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन प्राधिकरणाच्या अध्यक्षांच्या पूर्व संमतीने फेरीवाला संघाच्या २५ सभासदांना बी-२ या इमारतीनजिक २० चौ.फुटाचे तात्पुरत्या स्वरुपावर स्टॉल्स् बांधण्यास परवानगी दिली आहे.

यावर सविस्तर चर्चा करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८५८ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे उपकलम (२) मधील अधिकारांचा व याबाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ चे नियम ४ याबाबतीत शिथिल करुन प्राधिकरण याद्वारे याव टिप्पणीच्या परिच्छेद क्र.४ मधील प्रस्तावाप्रमाणे व याव टिप्पणीस जोडलेल्या जोडपत्र-२ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार आर.टी.ओ.घाटकोपर फेरीवाला संघाच्या सभासदांना वडाळा भारवाहक तळातील बी-२ इमारतीनजिक ४ फूट X ५ फूट आकाराचे स्टॉल्स तात्पुरत्या स्वरुपावर बांधण्यासाठी सुमारे २० चौ.फूट जमीन दरमहा प्रत्येकी रु.१०० भाडयाने वाटप करण्यास संमती देत आहे. तसेच, प्राधिकरणाच्या मा.अध्यक्षांनी केलेल्या कार्यवाहीस प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : वडाळा भारवाहक तळामध्ये मुंबई मालवाहतूक संस्था (बी.जी.टी.ए.) व दि महाराष्ट्र राज्य बस, टेम्पो, ट्रक वाहतूक महासंघ,महासंघाला दिलेल्या भूखंडांसंदर्भात त्यांच्या सभासदांनी स्थापन केलेल्या सोसायटया / कंपन्यांबरोबर भाडेपट्टा विलेख करणेसाठी हस्तांतरण मुल्य न घेणेबाबत.**

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८५९ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अनुसार तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारित) मधील तरतूदींनुसार प्राधिकरण याद्वारे १४.०२.२००० रोजी पारित केलेल्या प्राधिकरणाच्या ९७ व्या बैठकीतील ठराव क्र.८३२ (२) प्रमाणे मान्य केलेल्या अटी व शर्तीपैकी हस्तांतरण मूल्य आकारण्याची अट वगळण्यात येत आहे व महानगर आयुक्तांना त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : वांद्रे-कुर्ला संकुलातील इस्पितळासाठी आरक्षित भूखंड भाडेपट्टयाने देण्याबाबत.**

इस्पितळासाठी आरक्षित असलेल्या वाटपासाठी निविदा मागविल्या होत्या. त्यासाठी प्राप्त झालेल्या २ निविदांमध्ये रु.६००१/- प्रती चौ.मीटर बांधकाम क्षेत्र असा सर्वाधिक दर असलेली कॉटेम्पररी हेल्थकेअर प्रायव्हेट लि. यांची निविदा तांत्रिक दृष्टयाही योग्य असल्याने ती स्विकारण्याची शिफारस करण्यात आली.

बाब टिप्पणीत विशद केलेल्या तपशिलाचा विचार करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८६० :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ चा नियम ४ (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे प्रस्तावित करमणूक केंद्राच्या उभारणीसाठी वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील १०,००० चौ.मीटर क्षेत्राचा व १५,००० चौ.मीटर बांधकाम क्षेत्र उपलब्ध होणारा इस्पितळासाठी आरक्षित भूखंड मुं.म.प्र.वि.प्रा. (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ च्या "डी" नमुन्यातील भाडेपट्टा कराराच्या तारखेपासून ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने मे. कॉटेम्परररी हेल्थकेअर प्रायव्हेट लि. यांस वाटप करण्यासाठी निविदेतील अटी व शर्तींच्या अधीन राहून, रु.६००१/- प्रती चौ.मीटर बांधकाम क्षेत्र या सर्वाधिक दराने आलेली निविदा स्विकारण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्त यांना या ठरावाची अंमलबजावणी करण्यास आणि आवश्यक असेल त्याप्रमाणे "डी" नमुन्यातील भाडेपट्टा विलेखाच्या नमुन्यात योग्य ते बदल करण्यांस प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.१० : प्राधिकरणाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तिसऱ्या मुंबई पाणी पुरवठा व जलनिःसारण प्रकल्पाच्या उर्वरीत कामांसाठी मंजूर केलेल्या कर्ज सहाय्याची मुदत एक वर्षाने वाढविणे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने तिसऱ्या मुंबई पाणी पुरवठा व जलनिःसारण प्रकल्पासाठी जून, २००० अखेरपर्यत रु.१७६.३९ कोटी खर्च केले असुन

सदर प्रकल्पाकरीता प्राधिकरणाने रु.११३.६११ कोटी इतके कर्ज मंजूर केले आहे. प्राधिकरणाने सदर प्रकल्पासाठी रु.१००.९७ कोटी इतके कर्ज पालिकेस माहे जून, २००० पर्यंत वितरीत केलेले आहे. तसेच पालिकेने कर्जावरील अवितरीत रक्कमेवर कर्जाच्या अटीनुसार बांधीलकी आकारही दिलेला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रकल्पाची काही अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरीता कर्जाची मुदत एक वर्षाने म्हणजे मार्च, २००१ पर्यंत बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.४ मधील क्र.२ ते ७ या अटींच्या अधीन राहून वाढवावी अशी विनंती केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८६१</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २१-अ अंतर्गत प्राप्त झालेल्या तसेच याबाबतीत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन तिस-या मुंबई पाणीपुरवठा व जलनिःसारण प्रकल्पाच्या उर्वरित कामांसाठी प्राधिकरणाने आपल्या दिनांक ३१ ऑगस्ट, १९९८ च्या ठराव क्र.७९२ अन्वये मंजूर केलेल्या रु.११३.६११ कोटीच्या कर्ज सहाय्याची मुदत मूळच्या दिनांक १ एप्रिल, २००० पासून दिनांक ३१ मार्च, २००१ पर्यत एका वर्षाने वाढविण्यास बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.४ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या आधी केलेला कर्ज करार एक बदलांचा कर्ज करार करुन प्रस्तावित केल्याप्रमाणे योग्य रीतीने बदलण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. त्यामध्ये (अ) पालिका वर्ष २०००-२००१ साठीच्या कर्जापैकी अवितरित कर्जावर १% बांधिलकी आकार देईल,

(ब) एकूण कर्जाची रक्कम प्राधिकरणाने मंजूर केलेल्या रु.११३.६११ कोटीहून अधिक असणार नाही आणि (क) कर्जसहाय्याच्या इतर सर्व अटी मूळ अटींप्रमाणेच रहातील; यांचा समावेश असेल."

**बाब क्र.११ : प्राधिकरण व वास्तूशिल्प फाऊंडेशन यांना संयुक्तरित्या मिळालेल्या पुरस्कार रकमेची विभागणी.**

या प्रस्तावासंबंधीची कायदेशीर बाजू प्राधिकरणाचे विधी सल्लागार यांनी विशद केली. त्यांच्या मते या कामाचा प्रकाशन अधिकार (Copy rights) प्राधिकरणाकडे असल्यामुळे वास्तूशिल्प फाऊंडेशनचा बक्षिसाच्या रकमेवर कोणताही अधिकार नाही. तसेच प्राधिकरणाकडे जमा झालेली बक्षिसाची रक्कम खाजगी संस्थेला देण्याचे अधिकार प्राधिकरणाच्या अधिनियमात नाहीत. त्यामुळे बक्षिसाची अर्धी रक्कम वास्तूशिल्प फाऊंडेशनला देणे कायद्याच्या चौकटीत बसणारे नाही.

वरील कायदेशीर बाबींचा विचार करुन प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता दिली नाही.

**बाब क्र.१२ : प्राधिकरणाचा सन १९९८-९९ चा वार्षिक अहवाल.**

प्राधिकरणाचा सन १९९८-९९ चा प्रारुप वार्षिक अहवाल मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ८६२ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १९९८-९९ सालच्या वार्षिक अहवालाला हे प्राधिकरण मान्यता देत आहे व हा अहवाल राज्य शासनास सादर करण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.१३ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (प्रवास भत्ता) विनियम, १९७५ मध्ये सुधारणा.**

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श करुन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८६३ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ चे पोटकलम (२) व कलम ५० द्वारा प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे प्रस्तावित केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (प्रवास भत्ता) विनियम, १९७५ मध्ये जोडपत्र (१) अन्वये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे :-

१. (१) या विनियमांना *मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (प्रवास भत्ता) (सुधारणा) विनियम, १९९९* असे संबोधण्यात यावे.

(२) ही सुधारणा दिनांक ४ डिसेंबर, १९९९ पासून अंमलात येईल. यापूर्वी अदा करण्यात आलेल्या प्रवास भत्त्याच्या मागण्या पुन्हा उपस्थित करता येणार नाहीत.

२. विनियम क्र.८ मध्ये रु.२०००/- या शब्दांच्या व आकडयांच्या जागी रु.६५००/- हे शब्द व आकडे घालण्यात येतील.

३. सध्याच्या विनियम १५ च्या जागी खाली विनियम घालण्यात येईल :-

*१५ महाराष्ट्र शासन वेळोवेळी आपल्या कर्मचा-यांसाठी विहित करील त्याच दराने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना दैनिक भत्ता दिला जाईल.*"

**बाब क्र.१४ : वांद्रे-कुर्ला संकुलातील करमणूक केंद्रासाठी आरक्षित भूखंड भाडेपट्टयाने देण्याबाबत.**

करमणूक केंद्रासाठी आरक्षित असलेल्या भूखंडाच्या वाटपासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यासाठी प्राप्त झालेल्या दोन निविदांमध्ये रु.१६,१४६ प्रती चौ.मीटर बांधकाम क्षेत्र असा सर्वाधिक दर असलेली मे.रिलायन्स कॅपिटल लि. यांची निविदा अन्य तांत्रिकदृष्टया योग्य असल्याने ती स्विकारण्याची शिफारस करण्यात आली.

बाब टिप्पणीत विशद केलेल्या तपशिलाचा विचार करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ८६४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ चा नियम ४ (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे प्रस्तावित करमणूक केंद्राच्या उभारणीसाठी वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील १०३०९ चौ.मीटर क्षेत्राचा व २०६१८ चौ.मीटर बांधकाम क्षेत्र उपलब्ध होणारा करमणूक केंद्रासाठी आरक्षित भूखंड मुं.म.प्र.वि.प्रा. (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ च्या "डी" नमुन्यातील भाडेपट्टा कराराच्या तारखेपासून ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने मे. रिलायन्स कॅपिटल लि. यांस वाटप करण्यासाठी निविदेतील अटी व शर्तीच्या अधीन राहून, रु.१६१४६ प्रती चौ.मीटर बांधकाम क्षेत्र या सर्वाधिक दराने आलेली निविदा स्विकारण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. तसेच मे.रिलायन्स कॅपिटल लि. यांनी प्रकल्पासाठी स्थापन केलेल्या Special Purpose Vehicle (SPV) ला भाडेपट्टा देण्यास मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यास आणि आवश्यक असेल त्याप्रमाणे "डी" नमुन्यातील भाडेपट्टा विलेखाच्या नमुन्यात योग्य ते बदल करण्यांस महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.१५</u> : <u>ओशिवरे जिल्हा केंद्राचा आढावा.</u>

ओशिवरा जिल्हा केंद्राची पार्श्वभूमी सद्यस्थिती व व्यापारी उपयोगासाठी केल्या जाणाऱ्या विकासात येणाऱ्या अडचणी विशद करण्यात आल्या. टिप्पणीमध्ये नमूद केलेला पर्याय-२ प्राधिकरणाने चर्चेनंतर स्विकारण्याचे ठरविले. विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून प्राधिकरणाने स्वामी विवेकानंद रस्त्याच्या पूर्वेकडील ओशिवरे जिल्हा केंद्राच्या अधिसूचित क्षेत्रासाठी कार्यरत रहावे असे ठरविण्यात आले. व्यापारी विभागात ५०% निवासी वापर अनुज्ञेय करावा व त्या अनुषंगाने विकास प्रस्तावास जरुर त्या बदलास मान्यता देण्यात यावी असे ठरविण्यात आले.

त्यानुसार, प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८६५</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाने ओशिवरे जिल्हा केंद्रातील एस.व्ही.रोडच्या पूर्वेकडील क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून प्राधिकरणाने कार्यरत रहावे आणि एस.व्ही.रोडच्या पश्चिमेकडील क्षेत्र ओशिवरे जिल्हा केंद्राच्या अधिसूचित क्षेत्रातून वगळण्याच्या प्रस्तावाला प्राधिकरण मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, विशेष नियोजन प्राधिकरणाचे अधिकार क्षेत्र व सीमा यामध्ये सुसुत्रिकरण करण्याबाबत आणि ओशिवरा जिल्हा केंद्राच्या सीमा नमूद करणाऱ्या शासन निर्णय क्र.टी.पी.बी.-४२८२/२६-युडी-५,

दिनांक १८ जून १९८२ यामध्ये दुरुस्त्या करण्याबाबत शासनाला विनंती करण्याविषयी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अनुसार मंजूर नियोजन प्रस्तावांमध्ये बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र. १०.२.३ मध्ये नमूद केलेले व अनुषंगिक फेरबदल समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरु करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे प्रस्तावित फेरबदलासंबंधात प्राधिकरणाकडे येणारे आक्षेप व सूचना यावर विचार करण्यास आणि असे आक्षेप व सूचना करणाऱ्या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर याबाबतचा आपला अहवाल प्राधिकरणाच्या निर्णयासाठी सादर करण्यास महानगर आयुक्त आणि प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र.१६ : भिवंडी नगरपरिषदेच्या क्षेत्राचा पर्यावरण स्थिती अहवाल तयार करण्याबाबतचा अभ्यास करण्याकरिता नगरपरिषदेला अनुदान रुपाने अर्थसहाय्य करण्याबाबत.

भिवंडी नगरपरिषदेकडे भरपूर निधी असल्यामुळे प्राधिकरणाने सदर प्रकल्पासाठी अनुदान देण्याची आवश्यकता आहे किंवा कसे, तसेच ज्या नगरपालिकेस पर्यावरण स्थितीचा अहवाल करण्यासाठी खरोखरच निधीची आवश्यकता असेल अशा नगरपालिकेस अनुदानरुपाने निधी देण्यात यावा असे मत काही सदस्यांनी प्रदर्शित केले. सदर प्रस्तावावर चर्चा झाल्यावर, सर्व 'अ' वर्ग नगरपरिषदांना पर्यावरण स्थितीचा अहवाल तयार करणे, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम,

१९६५ च्या ७७(१अ) नुसार बंधनकारक आहे ही बाब विचारात घेता, सदर प्रस्तावास सशर्त मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८६६</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम १२ (१) (ग) आणि कलम २१(अ) आणि याबाबतीत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन प्राधिकरण भिवंडी नगरपरिषद क्षेत्रासाठी पर्यावरण स्थिती अहवाल तयार करण्याकरीता अनुदान रुपाने रु.४,२४,५००/- देण्यास बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे मंजूरी देत आहे. परंतु पर्यावरण स्थितीचा अहवाल तयार करण्यात आल्यावर सदर अहवालाची अंमलबजावणी भिवंडी नगरपरिषद करील याचे बंधन भिवंडी नगर परिषदेकडे राहिल.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण भिवंडी नगरपरिषदेकडून वरील अभ्यास शास्त्रीयदृष्टया योग्य त्या रितीने पूर्ण करुन घेण्याविषयी योग्य ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्र.१७</u> : <u>प्राधिकरणाचे सन १९९९-२००० सालचे वार्षिक लेखे</u>.

प्राधिकरणाने सन १९९९-२००० सालच्या प्राधिकरणाच्या वार्षिक लेख्यांना मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८६७ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, विषय टिप्पणी सोबत सादर केलेल्या प्राधिकरणाच्या १९९९-२००० च्या वार्षिक लेख्यांची प्राधिकरण याद्वारे नोंद घेत आहे व त्यास मान्यता देत आहे."

**<u>बाब क्र.१८ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सेवा शर्ती) विनियम, १९७७ मध्ये दुरुस्ती</u>**

प्राधिकरणातील कर्मचा-यांना जोपर्यंत प्राधिकरण स्वत:चे सेवा व शर्तीचे नियम करीत नाही तोपर्यंत राज्य शासन वेळोवेळी नियम व वेतन भत्ते यामध्ये ज्या सुधारणा करील (निवृत्ती वेतन, उपदान प्रदान व भविष्य निधी वगळून) त्या प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांना जसेच्या तसे लागू करण्यात येतात. शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांनी राजीनामा सादर करतेवेळी एक महिन्याची पूर्व सूचना किंवा त्यांचेकडून एक महिन्याचे मूळ वेतन वसूल करण्यासंबंधीचे आदेश शासनाने निर्गमित केलेले आहेत. सदर शासकीय निर्णय प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांनाही लागू करणे आवश्यक आहे असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी सार्वजनिक उपक्रमांतील अधिका-यांनी राजीनामा दिल्यास तातडीने त्यांच्या जागी दुस-या अधिका-याची नेमणूक करण्याच्या प्रक्रियेस काही कालावधी आवश्यक असल्यामुळे अधिका-यांना राजीनामा देण्यासाठी ३ महिन्याची पूर्व सूचना किंवा पूर्व सूचनेऐवजी त्यांच्याकडून ३ महिन्याचे मूळ वेतन वसूल करण्याबाबतचे मत प्रदर्शित केले.

त्यानुसार, प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. ८६८:</u>**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सेवा व शर्ती) विनियम, १९७७ मधील नियम ४(१) मधील तरतूदीमध्ये पुढील सुधारणा करण्यात येत आहे आणि ज्या कर्मचा-यांचा वेतनश्रेणीचा वरचा टप्पा रु. १०,०००/- पेक्षा कमी आहे अशा सर्व कर्मचा-यांना राजीनामा देण्यासाठी एक महिन्याची पूर्व सूचना देणे किंवा पूर्वसूचनेऐवजी एक महिन्याचे मूळ वेतन देणे

बंधनकारक राहील तसेच ज्या अधिका-यांचा वेतनश्रेणीचा वरचा टप्पा रु.१०,०००/- पेक्षा जास्त आहे त्या कर्मचा-यांना / अधिका-यांना राजीनामा देण्यासाठी ३ महिन्यांची पूर्व सूचना देणे किंवा पूर्वसूचनेऐवजी ३ महिन्यांचे मूळ वेतन देणे बंधनकारक राहील."

**बाब क्र.१९ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण चतुर्थश्रेणी कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थेस ठाणे तालुक्यातील पांचपाखाडी येथील जमिनीचे वाटपाबाबत ... स.नं.१५६/१ भाग व १५७/१ भाग पैकी**

बाब टिप्पणीमध्ये मुख्यतः शासनाच्या धोरणाप्रमाणे प्राधिकरणाची जमीन प्राधिकरणाच्या कर्मचारी गृहनिर्माण संस्थेस द्यावी असा प्रस्ताव होता. परंतु, तत्वतः शासनाचे धोरण सार्वजनिक उपक्रमांना लागू करावे याबद्दल एकमत झाले नाही. त्यामुळे अन्य सार्वजनिक उपक्रम जसे सिडको, म्हाडा व एमआयडीसी ह्यामध्ये कर्मचारी गृहनिर्माण संस्थेस जमीन देणेबद्दल काय धोरण आहे त्याच्याशी तुलना करावी तसेच प्राधिकरणाच्या सध्याच्या जमीन वितरण नियमाप्रमाणेच प्राधिकरणाच्या कर्मचा-यांच्या गृहनिर्माण संस्थेस जमीन द्यावी काय हे देखील तपासावे आणि वरील बाबी विचारात घेऊन सविस्तर प्रस्ताव पुन्हा प्राधिकरणाकडे सादर करण्यात यावा असे ठरले.

**बाब क्र.२० : वडाळा भारवाहक तळातील बी-२ इमारतीमधील गाळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास भाडेतत्वावर वाटप करणे.**

या विषयावर चर्चा करताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, वडाळा भारवाहक तळात बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य विकास महामंडळास (सार्वजनिक बांधकाम विभागाच्या काही कार्यालयांसाठी) तूर्त गाळयांची आवश्यकता नसल्यामुळे सदर बाब टिप्पणी मा.अध्यक्षांच्या परवानगीने मागे घेण्यात आली.

**बाब क्र.२१ :** **लार्सन ॲण्ड टुब्रो लि.यांना नरिमन पॉईन्ट येथील बहुमजली वाहन तळासाठी भाडेपट्टयाने दिलेला भूखंड वाटपाच्या अटी व शर्ती शिथिल करण्याबाबत.**

ह्या प्रकरणाची पार्श्वभूमी विशद करताना असे सांगण्यात आले की, सन १९९७ मध्ये नरिमन पॉईन्ट येथील बहुमजली वाहन तळ विकसित करणेसाठी भूखंड देणेसंबंधी निविदा मार्गविण्यात आल्या होत्या. त्यासाठी जून, १९९७ मध्ये लार्सन अँड टुब्रो लि. यांची एकमेव निविदा प्राप्त झाली ती प्राधिकरणाने एप्रिल, १९९८ मध्ये स्विकारली. लार्सन अँड टूब्रो लि. यांनी अधिमूल्याची सर्व रक्कम प्राधिकरणाकडे भरली आहे व आता अशी विनंती केली आहे की, भूखंडाचा भाडेपट्टा विलेख हा एल. अँड टी. क्रॉसरोड लि. ह्या नावाच्या एस.पी.व्ही. च्या स्वरुपात स्थापन केलेल्या कंपनीस देण्यात यावा.

हा प्रस्ताव स्विकारावयाचा असेल तर नव्या कंपनीच्या भाग भांडवलापैकी किमान ५१% भाग भांडवल लार्सन अँड टूब्रो लि. यांचे असणे आवश्यक आहे असे प्रतिपादन प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी केले. त्यानंतर विधी सल्लागार यांनी असे स्पष्टीकरण दिले की, लार्सन अँड टूब्रो लि. यांच्या निविदेतच असे नमूद करण्यात आले होते की, प्रकल्पास लागणारा वित्त पुरवठा त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नातून करण्यात येईल किंवा त्यासाठी एक एस.पी.व्ही. स्थापन करण्यात येईल. आता निविदा स्विकारल्यामुळे त्यांनी स्थापन केलेल्या एस.पी.व्ही. बरोबर भाडेपट्टा विलेख करण्यास कोणतीही हरकत नाही. मा.अध्यक्षांनी विधी सल्लागाराचे स्पष्टीकरण मान्य केले.

त्यानंतर, पुढील ठराव मंजूर करण्यात आला :-

<u>ठराव क्र. ८६९</u> :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ३ चे पोटकलम (२) अनुसार तसेच मुं.म.प्र.वि.प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारित) मधील तरतुदीनुसार प्राधिकरण याद्वारे पूर्वी पारित केलेल्या ठराव क्र.७६७ मध्ये अंशतः फेरबदल करुन लार्सन ॲण्ड टुब्रो लि. यांना मंजूर केलेला भूखंड आता त्यांच्या एसपीव्ही म्हणजे एल् ॲण्ड टी क्रॉस रोड्स लि. यांना भाडेपट्ट्याने देण्यास मान्यता देत आहे. महानगर आयुक्तांना त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.२२</u> : **कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६ च्या <u>कलम २६ अन्वये प्रसिध्दीकरण करण्यासाठी मुदतवाढ</u>**

प्रारुप योजना तयार असल्यानेही विविध निवडणूकांमुळे व त्या अनुषंगाने लागू झालेल्या आचारसंहीतेमुळे प्रारुप विकास योजना विचारात घेऊन ती प्रसिध्द करणे प्राधिकरणास शक्य झालेले नाही हे लक्षात घेऊन योजना प्रसिध्द करणेसाठी मुदतवाढ मागणीच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली.

त्यानुसार, पुढील ठराव मंजूर करण्यात आला :-

<u>ठराव क्र. ८७०</u> :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ अन्वये कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी प्रारुप

विकास योजना तयार करुन प्रसिध्द करण्यासाठी दिनांक ५ जुले,२००० पासून एक वर्षाच्या कालावधीची मुदत वाढ मागण्यासाठी शासनाकडे अर्ज करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. तसेच सदर अर्ज व इतर पत्र व्यवहार करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.२३</u> : <u>वडाळा भारवाहक तळातील अ-१, ब-१, ब-२ व ड-२ या इमारतीतील रिकाम्या गाळयांचे वाटप करणे.</u>**

२३.१ प्राधिकरणाच्या दिनांक १४.०२.२००० रोजी झालेल्या ९७ व्या बैठकीतील ठराव क्र.८३३ अन्वये मंजूर केलेल्या सुधारित अटी अन्वये अ-१, ब-१, ब-२ व ड-२ या इमारतीच्या तळ मजला व पहिल्या मजल्यावरील ५० गाळयांसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. गाळयांचा राखीव दर रु.१२,०००/- प्रति चौ.मीटर असा निश्चित केला होता. परंतु, तो निविदा पुस्तिकेत नमुद केला नव्हता. बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे उच्चतम देकाराच्या ११ निविदा मंजूर करण्यात आल्या.

२३.२ त्याचप्रमाणे पहिल्या मजल्यावरील राहिलेले रिकामे गाळे रु.१३,४७५/- या उच्चतम प्राप्त दराने व तळमजल्यावरील गाळे उच्चतम व निच्चतम दराच्या येणाऱ्या सरासरी रु.१५,१३६/- प्रति चौ.मीटर या दराने "प्रथम येईल त्यास प्रथम पसंती" या तत्वावर वितरीत करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात आले. या वितरणासाठी दिनांक २९.०८.२००० पासून तीन वर्षांचा कालावधी वैध असेल. तथापि, एक वर्षानंतर दराचा पुनर्विचार करण्यात यावा.

यावर सविस्तर चर्चा करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८७१</u> :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम (२) मधील अधिकारांचा वापर करुन आणि याबाबतीत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.२ मध्ये वर्णन केलेल्या उच्चतम दराच्या ११ निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे परिच्छेद क्र.३ मध्ये वर्णन केलेल्या एकूण २३ निविदा नामंजूर करण्यास व त्यांनी भरलेल्या अनामत रकमा त्यांना परत करण्यासही मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, ठराव क्र.८३३ मध्ये अंशतः बदल करुन पहिल्या मजल्यावरील उर्वरित गाळे रु.१३,४७५/- प्रती चौरस मी. या उच्चतम दराने व गोदामे उच्चतम व निच्चतम दराच्या येणा-या सरासरी रु.१५,१३६/- प्रती चौ.मी. या दराने बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.४ मध्ये प्रस्तावित केल्या प्रमाणे "प्रथम येईल त्यास प्रथमतः पसंती" या तत्वावर वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येतो की, सदर गाळे वितरण करण्यासाठी दिनांक २९.०८.२००० पासून ३ वर्षांचा कालावधी वैध असेल तथापि, दर वर्षी वरील दराबाबत पुनर्विचार करण्यात येईल.

"आणखी असाही ठराव करण्यात येतो की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील सर्व उपाययोजना करण्यास याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्र.२४ :</u> वांद्रे-कुर्ला संकुलातील जी ब्लॉकमधील चार भूखंडांचे पेट्रोल / डिझेल पंप व सर्व्हिस <u>स्टेशन उभारणीसाठी वाटप करणेबाबत.</u>

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८७२</u> :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम (२), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनिची विल्हेवाट) विनियम, १९७७ चा नियम १६ याप्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील चार पेट्रोल / डिझेल पंप व सर्व्हिस स्टेशन उभारण्यासाठी भूखंड बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.३, ४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे (अ) भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (ब) हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (क) इंडो बर्मा पेट्रोलियम लिमिटेड व (ड) इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना अनुक्रमे भूखंड क्र. ए, बी, सी व डी हे किंवा यापैकी कोणताही एक भूखंड ०.८० इतक्या चटई क्षेत्र निर्देशांकासह ८० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने रु.२०,०००/- दर चौ.मीटर भूखंड क्षेत्र याप्रमाणे अधिमूल्य आकारुन उक्त

विनियमाच्या नियम ७ प्रमाणे, तसेच उक्त विनियमाच्या अन्य अटी व शर्तीनुसार देण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, पेट्रोल / डिझेल व सर्व्हिस स्टेशन्स उभारण्यासाठी देऊ करण्यात आलेला भूखंड एखाद्या कंपनीने न स्विकारल्यास सदर न स्विकारलेले भूखंड "प्रथम पैसे भरणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील इतर तेल कंपनीस प्रथम वाटप" या तत्वावर उक्त विनियमाच्या विनियम ७ प्रमाणे, तसेच उक्त विनियमाच्या अन्य अटी व शर्तीनुसार वाटप करण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, उक्त विनियमाच्या प्रपत्र "इ" (भाडेपट्टा विलेखाचा नमूना) मध्ये योग्य ते बदल करुन याबाबतीत भाडेपट्टा करार करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.२५</u> : **मुं.म.प्र.- वास्तूवारसा संरक्षण संस्था व मुं.म.प्र. - पर्यावरण सुधारणा संस्था हयांचे दिनांक ०१.०४.१९९८ ते दिनांक ३१.०३.१९९९ <u>या कालावधीचे परिक्षित लेखे व वार्षिक अहवाल.</u>**

दिनांक ०१.०४.१९९८ ते दिनांक ३१.०३.१९९९ या कालावधीचे परिक्षित लेखे व वार्षिक अहवाल याची नोंद घेऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ८७३</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, विषय टिप्पणी सोबत सादर केलेल्या मुं.म.प्र.- वास्तुवारसा संरक्षण संस्था व मुं.म.प्र. - पर्यावरण सुधारणा संस्था यांचे दिनांक ०१.०४.१९९८ ते दिनांक ३१.०३.१९९९ या कालावधीचे परिक्षित लेखे व वार्षिक अहवाल यांची प्राधिकरण याद्वारे नोंद घेत आहे."

बैठकीच्या शेवटी मा.अध्यक्षांनी जमिनीच्या व स्थावर मालमत्तेच्या किंमती प्रकर्षाने खाली येत असल्यामुळे प्राधिकरण किंवा सिडको अशा सार्वजनिक उपक्रमांकडून ज्या संस्थांनी जमिनी विकत घेतल्या आहेत. त्या जमिनी पुन्हा परत घेण्याबाबत व अदा केलेल्या जमिनीची रक्कम परत मिळविण्यासाठी त्या संस्थांकडून मागण्या मोठया प्रमाणावर येत आहेत हे सभासदांच्या दृष्टोत्पत्तीस आणून दिले.

मा.अध्यक्षांनी त्यासाठी असेही सूचविले की, हया समस्येसंबंधी सामाईक धोरण असणे जरुरीचे ठरेल. असे धोरण ठरविण्यासाठी त्यांनी एक उप-समिती गठीत करावी असे निर्देशित केले. त्यास अनुसरुन प्राधिकरणाने खालील सभासदांची एक उप-समिती गठीत करण्याचे ठरविले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रधान सचिव, नगर विकास विभाग | - | अध्यक्ष |
| २. | महानगर आयुक्त, | - | सदस्य |
| ३. | उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको | - | सदस्य |

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

*************

<u>जोडपत्र १ व २</u>

जोडपत्र-१

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ९८ वी बैठक

दिनांक : २९ ऑगस्ट, २०००

## : ठ रा व :

श्री.प्रभाकर नारायण पाटील, माजी अध्यक्ष, कुलाबा (रायगड) जिल्हा परिषद, यांचे दिनांक २१ फेब्रुवारी, २००० रोजी निधन झाले. श्री. पाटील हे दिनांक १८.०६.१९७९ ते दिनांक १९.०५.१९८३ या कालावधीत कुलाबा (रायगड) जिल्हा परिषदेचे अध्यक्ष ह्या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री.पाटील यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद आणि आकस्मिक निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

या ठरावाची प्रत दिवंगत श्री. पाटील यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात हे प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे.

**********

जोडपत्र-२

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ९८ वी बैठक

दिनांक : २९ ऑगस्ट, २०००

### : ठ रा व :

श्री.पांडुरंग शिवराम देशमुख, माजी विधानपरिषद सदस्य यांचे दिनांक १८ एप्रिल, २००० रोजी निधन झाले. श्री. देशमुख हे दिनांक १९.०८.१९८५ ते दिनांक ०५.१२.१९८६ या कालावधीत विधान परिषदेचे सदस्य ह्या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री.देशमुख यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद आणि आकस्मिक निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

या ठरावाची प्रत दिवंगत श्री. देशमुख यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात हे प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे.

**********